# जिल्हा परिषद अमरावती

**कॅम्प रोड, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ अमरावती ४४४६०२**

**दूरध्वनी कमांक - ०७२१ २६६२९२६**

ईमेल - ceozp.amravati@maharashtra.gov.in Websit- www.zpamravati.gov.in


क्रमांक : जिप/मुकाअ/स्विस/२०१७/४८ दिनांक :२२ मार्च, २०१७

**अभिलेख व्यवस्थापन करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम..**

**परिपत्रक**

कार्यालयीन दस्ताऐवजाचे वर्गीकरण तसेच कालबाहय झालेल्या कागदपत्राचे नाशनीकरण करण्याबाबत शासनाने वेळोवेळी काढलेल्या परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु, कार्यालयातील वाढल्या दस्ताऐवजांची संख्या आणि वर्गीकरणाअभावी अभिलेखे ठेवण्यास कार्यालयात अपुरी जागा राहत असल्याची बाब कार्यालय प्रमुखांच्या बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे. वर्गीकरण करण्यात आलेले अभिलेखे ठेवण्यास कार्यालयात पुरेशी जागा उपलब्ध् असण्याची आवश्यकता मान्य़ करण्यात आलेली आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे सर्व विभागासाठी कार्यवाहीचे मुद्ये ठरविण्यात येत आहेत.

(१) आपल्या कार्यालयातील आवश्यक़ दस्ताऐवज ठेवण्यासाठी किती जागा लागेल याची अंदाज घेवून त्यांबाबतची माहिती सामान्य़ प्रशासन विभागाकडे १० एप्रिल २०१७ पर्यत सादर करावी.

(२) ज्या ठिकाणी अभिलेख ठेवण्यासाठी सोईची जागा होवू शकते, त्या खोलीची दुरुस्ती सामान्य़ प्रशासन विभाग आणि बांधकाम विभागाचे सहकार्याने २० एप्रिल २०१७ पर्यत पुर्ण करुन घ्यावी.

(३) प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र LOCK & KEY असावी.

(४) दरम्याचे कालावधीत विभागातील कर्मचा-यांचे मदतीने अनावश्यक़ कागदपत्राचे नाशनीकरण करण्यात यावे.

(५) विभाग निहाय RECORD ROOM चे उदघाटनाचा कार्यक्रम १ मे २०१७ रोजी सकाळी ८.१५ ते ९.०० वा. या कालावधीत सन्मा. जिल्हा पदाधिकारी यांचेहस्ते करण्यात यावा.

(६) सामान्य़ प्रशासन विभागाकडील सहायक प्रशासन अधिकारी आणि भांडार कक्षातील वरिष्ठ़ सहायक व कनिष्ट़ सहायक यांचेकडे मुख्यालयीन विभागातील पर्यवेक्षणाची जबाबदारी सोपविण्यात येत असून, दर मंगळवारी होणा-या खाते प्रमुखांच्या बैठकीत याबाबतचा अहवाल मुख्य़ कार्यकारी अधिकारी यांना सादर करावा.

KSK

**(डॉ. किरण कुलकर्णी, भाप्रसे)**
**मुख्य़ कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

प्रतिलिपी-

१. अतिरिक्त़ मुख्य़ कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना माहितीस्तव़ अग्रेषित.
२. सर्व कार्यालय प्रमुख, जिल्हा परिषद अमरावती.
३. सामान्य़ प्रशासन विभाग, जि.प. अमरावती.
४. तालुका स्तरावरील सर्व कार्यालय, जिल्हा परिषद अमरावती यांना वरील प्रमाणे कार्यवाहीस्तव अग्रेषित